# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
# Maharashtra Electricity Regulatory Commission

माहितीचा अधिकार

स्वच्छ भारत
एक कदम स्वच्छता की ओर

**निर्णय क्र. मविनिआ/माअअ/२०२३/अपील/०३/२०२३/०२६३** **दिनांक-०७.०६.२०२३**

| | |
|---|---|
| माहिती अधिकार अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक | :२०.०३.२०२३ |
| जन माहिती अधिकारी यांनी उत्तर दिल्याचा दिनांक | :१८.०४.२०२३ |
| प्रथम अपील प्राप्त झाल्याचा दिनांक | :२७.०४.२०२३ |
| प्रथम अपील निकाली काढल्याचा दिनांक | :०७.०६.२०२३ |

**समक्ष प्रथम अपीलीय अधिकारी**
**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, मुंबई**
**(माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ अंतर्गत.)**

**अपील क्र. ०३/२०२३**

**अपीलकर्ता:** श्री. बाळू लहू उगले

**विरुदध**

**प्रतिवादी :** जन माहिती अधिकारी, मविनिआ, मुंबई

**अपीलाचे तथ्य :-**

१) अपीलकर्ता यांनी दिनांक २०.०३.२०२३ रोजी माहिती अधिकार कायद्याअंर्तगत केलेला अर्ज आयोगाच्या कार्यालयास दिनांक २०.०३.२०२३ रोजी प्राप्त झाला. अपीलार्थी यांच्या दिनांक २०.०३.२०२३ रोजी माहिती अधिकार कायद्याअंर्तगत दाखल केलेल्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी समाधानकारक माहिती न पुरविल्यामुळे अपीलार्थी यांनी दिनांक २६.०४.२०२३ रोजी प्रथम अपील दाखल केले. (प्रथम अपील आयोगाच्या कार्यालयास दिनांक २७.०४.२०२३ रोजी प्राप्त झाले.)

२) प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांना दिनांक २७.०४.२०२३ रोजी नोटिस पाठवून दिनांक ०८.०५.२०२३ रोजी आयोजीत केली होती परंतू, जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक ०४.०५.२०२३ रोजी ई-मेलद्वारे वैद्यकिय अडचण असल्यामुळे सदर सुनावणीस हजर राहणे शक्य नसल्याने सुनावणी पुढे ढकण्यात येवून नवीन तारीख देण्याची विनंती केली होती, त्यानुषंगाने सदर सुनावणी पुढे ढकलण्यात येवून पुन:श्च सुनावणीस दिनांक ११.०५.२०२३ (गुरूवार) रोजी आयोजीत करण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी हे दोन्ही हजर होते. अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांनी मौखिक निवेदन सादर केले.

**३) अपिलातील दस्तऐवज व निवेदनावरुन अपिलातील मुद्दे खालील प्रमाणे आहेत -**

**मागितलेली माहिती:-**


१३वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई - ४०० ००५.
13th Floor, Centre No. 1, World Trade Centre, Cuffe Parade, Mumbai - 400 005.
**Tel.:** 022-2216 3964 / 2216 3965 / 2216 3969 **Fax :** 022-2216 3976
**E-mail :** mercindia@merc.gov.in **Website :** www.merc.gov.in

i. मा. आयोगाच्या कार्यालयातील तांत्रिक विभागातील अधिकारी आणि कर्मचारी यांची(२०१० ते आजतागायतची) बिंदूनामावली, आकृतीबंद, सेवाजेष्ठता यांच्या मंजुरीसाठी मा. आयोगाने GoM, मंत्रालय, मागासवर्गीय विभाग यांचेकडे किंवा इतर संबंधित विभागाकडे सादर केलेल्या फाईल, केलेली कारवाई व त्यानुषंगाने महाराष्ट्र शासनाची मिळालेली मंजुरी, पत्रव्यवहार इ. सर्व तत्सम साक्षांकित कागदपत्रे मिळावीत.

ii. मा. आयोगाच्या कार्यालयातील तांत्रिक विभागातील अधिकारी आणि कर्मचारी यांची (२०१० ते आजतागायत) दिलेल्या सर्व पदोन्नती याबाबतची प्रशासन विभागाच्या सादर केलेल्या व आयोगाची मंजुरी मिळालेल्या नस्ती, टिपणी, तत्सम शासन मंजुर बिंदुनामावली, DPC या संदर्भात केलेली कारवाई, मंजुरी, पत्रव्यवहार इ. सर्व साक्षांकित कागदपत्रे मिळावीत.

iii. मा. आयोगाच्या कार्यालयातील ST (अनुसूचित जमात) प्रवर्गातील तांत्रिक विभागातील सर्व अधिकारी (जसे कि सहाय्यक संचालक, उप संचालक, संचालक) यांची एकूण रिक्त पदे, मंजूर आकृतीबंद, सदर सर्व पदांची शासन मंजूर बिंदुनामावली याची सर्व साक्षांकित कागदपत्रे मिळावीत तसेच अशी सर्व ST प्रवर्गाची रिक्त पदे, भरण्यासाठी मा. आयोगाकडून वर्ष २०१० पासून आजतागायत किती वेळा आणि काय प्रयत्न केले याची सर्व साक्षांकित कागदपत्रे मिळावीत. SC (अनुसूचित जात) प्रवर्गातील पदे भरण्याकरिता प्रयत्न केले असतली तर तशी वर्षनिहाय माहिती देण्यात याची आणि याप्रमाणे ST प्रवर्गासाठी प्रयत्न केलेत कि नाहीत? याची माहिती/ कारणे द्यावीत.

iv. मा. आयोगाने यापूर्वी ज्या काही समित्या स्थापन केल्या होत्या. त्या समित्यापुढे आयोगातील तांत्रिक विभागातील सर्व मागासवर्गीय अधिकारी/ कर्मचारी यांनी मांडलेल्या समस्या, अडचणी सोडविण्याबाबत नेमकी काय कारवाई केली गेली आहे? व आयोगाने उपरोक्त समित्या स्थापन केल्यानंतर सर्व मागासवर्गीय अधिकारी/ कर्मचारी यांना नेमका काय व कसा न्याय मिळाला, याबाबतची सद्यस्थिती, त्याचा उपलब्ध अहवाल याबाबतची सर्व नस्ती, फाईल इ. साक्षांकित कागदपत्रे मिळावीत.

<u>जन माहिती अधिकारी यांचे उत्तर :-</u>

माहिती अधिकार अर्ज दिनांक २०.०३.२०२३ मध्ये मागीतलेल्या माहितीस जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर-

<u>वरिल मुद्दा क्रमांक (i) ला दिलेले उत्तर</u> :-

आयोगाच्या कार्यालयात सन २०१० पासून सेवाजेष्ठता सूची उपलब्ध नाही. कार्यालयात प्रथम तात्पुरती ज्येष्ठता सूची सन २०१७ मध्ये नव्याने तयार करण्यात आली आहे. तद्नंतर सन २०१७ पासून ते २०२२ पर्यंतची सेवा जेष्ठता सूची आयोगाच्या www.merc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. तसेच बिंदुनामावली मंजूरीसाठी मा. आयोगाने GoM, मंत्रालय, मागासवर्गीय विभाग यांचेकडे किंवा इतर संबंधित विभागाकडे सादर केलेल्या फाईल, केलेली कारवाई व त्यानुषंगाने महाराष्ट्र शासनाची मिळालेली मंजुरी, पत्रव्यवहार इ. बाबतची माहिती आयोगाच्या कार्यालयात उपलब्ध आहे. (एकूण ०६ पृष्ठे)

<u>वरिल मुद्दा क्रमांक (ii) ला दिलेले उत्तर</u> :-

आपण विचारलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ८ (१) (त्र) अंतर्गत असल्यामुळे उपलब्ध करता येत नाही.

**वरिल मुद्दा क्रमांक (iii) ला दिलेले उत्तर :-**

मा. आयोगाच्या कार्यालयातील ST (अनुसूचित जमात) प्रवर्गातील तांत्रिक विभागातील फक्त सहाय्यक संचालक हे एक पद रिक्त आहे. उपसंचालक (तांत्रिक) हे पद रिक्त नाही व संचालक (तांत्रिक) या पदाकरीता ST पदाचा संवर्ग लागू नाही. सदर सर्व पदांची शासन मंजूर बिंदूनामावली बाबतची माहिती मुद्दा क्र.१ मध्ये नमूद केलेली आहे. सदर बिंदुनामावली अद्याप शासनाकडून मंजूर झालेली नाही. तसेच मंजूर आकृतीबंद बाबत वर्ग ३ व ४ ची बिंदूनामावली प्रस्ताव बनवताना प्रशासन विभागाने तयार केलेला मंजूर आकृतीबंद सोबत जोडत आहे. (एकूण ०१ पृष्ठ)

**वरिल मुद्दा क्रमांक (iv) ला दिलेले उत्तर :-**

Information asked in question format. The Act does not permit raising imaginary questions and expecting the PIO to find answers for them.
A Public Information Officer (PIO) is not expected to provide intangible such as interpretations, opinions, advices, explanations, reasons as they cannot be said to be included in the definition of information in Section 2(f) of the RTI Act, 2005.

**प्रथम अपील दाखल करण्याचे कारण :-**

*माहिती असमाधानकारक आहे. तसेच माहिती अपुरी असून मुद्देसूद नाही. कागदपत्रे सांक्षांकीत केलेली नाहीत.*

**अपीलामध्ये निदर्शनास आलेले मुद्दे :-**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना माहिती अधिकारांच्या अर्जातील मुद्दा क्र. १, ३, व ४ च्या संबंधाने माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे व मुद्दा क्र. २ च्या संबंधाने माहिती हि कलम ८ (१) (त्र) अंतर्गत असल्यामुळे उपलब्ध करता येत नाही असे आदेश पारित केले आहे.

मुद्दा क्र. २ खालील प्रमाणे आहे.

"मा. आयोगाच्या कार्यालयातील तांत्रिक विभागातील अधिकारी आणि कर्मचारी यांची (२०१० ते आजतागायत) दिलेल्या सर्व पदोन्नती याबाबतची प्रशासन विभागाच्य सादर केलेल्या व आयोगाची मंजूरी मिळालेल्या नस्ती, टिपणी, तत्सम शासन मंजूर बिंदूनामावली, DPC या संदर्भात केलेली कारवाई, मंजूरी, पत्रव्यवहार ई. सर्व सांक्षाकित कागदपत्रे मिळावित."

वरील मुद्दा क्र. २ ची माहिती अपीलार्थी यांना नाकारण्यात आलेली असल्याचे दिसून येते.
मा. अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ८ (१) (त्र) अंतर्गत असल्यामुळे उपलब्ध करता येत नाही हे कारण दिलेले आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ८ (१) (त्र) खालील प्रमाणे आहे.

*“कलम ८ (१) --------*

**(त्र) जी माहिती प्रकट करणे हे व्यापक लोकहिताच्या दृष्टीने आवश्यक आहे अशी, यथास्थिती, केंद्रीय जन माहिती अधिकाऱ्याची, राज्य जन माहिती अधिकाऱ्याची किंवा अपील प्राधिकाऱ्याची खात्री पटली असेल, ती खेरीजकरून, जी प्रकट करण्याचा कोणत्याही सार्वजनिक कामकाजाशी किंवा हितसंबंधांशी काहीही संबंध नाही किंवा जी व्यक्तीच्या खाजगी बाबीत आगंतुक हस्तक्षेप करील, अशी वैयक्तिक तपशीलासंबंधातील माहिती :**

**परंतु, जी माहिती संसदेला किंवा राज्य विधानमंडळाला देण्यास नकार देता येणार नाही, ती माहिती कोणत्याही व्यक्तीला देण्यासही नकार देता येणार नाही.”**

***माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या खालील प्रस्तावनेचे/भूमिकेचे अवलोकन करणे आवश्यक आहे.***

***माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ (२००२ चा अधिनियम क्रमांक २२):- “प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणाच्या कामकाजामध्ये अधिकाधिक पारदर्शकता आणि उत्तरदायित्व निर्माण करण्याच्या दृष्टीने, सार्वजनिक प्राधिकरणांच्या नियंत्रणाखालील माहिती नागरिकांना मिळवता यावी म्हणून, नागरिकांच्या माहिती मिळण्याच्या अधिकाराची व्यवहार्य शासन पध्दत आखून देण्याकरिता, केंद्रीय माहिती आयोग आणि राज्य माहिती आयोग घटित करण्याकरिता आणि तत्संबंधित किंवा तदनुषंगिक बाबींकरिता तरतूद करण्यासाठी अधिनियम.***

***ज्याअर्थी, भारताच्या संविधानाद्वारे लोकशाही गणराज्याची स्थापना करण्यात आलेली आहे;***

***आणि ज्याअर्थी, लोकशाहीमध्ये माहितगार नागरिक समूह आणि माहितीची पारदर्शकता या बाबी तिच्या कार्यशीलतेच्या दृष्टीने, तसेच भ्रष्टाचाराला आळा घालण्याच्या व राज्य शासने व त्यांच्या यंत्रणा यांना प्रजेला जाब देण्यास उत्तरदायी ठरविण्याच्या दृष्टीने अत्यावश्यक आहेत;***

***आणि ज्याअर्थी, प्रत्यक्ष व्यवहारात माहितीच्या प्रकटनामुळे अन्य सार्वजनिक हितसंबंधांना तसेच, शासनांचे कामकाज कार्यक्षमरीत्या चालणे, मर्यादित राजकोषीय साधनसंपत्तीचा इष्टतम वापर होणे आणि संवेदनक्षम माहितीची गोपनीयता राखणे, या बाबींनाही बाध येण्याची शक्यता आहे;***

***आणि ज्याअर्थी, लोकशाहीच्या आदर्शाची परमोच्चता कायम राखताना, या परस्परविरोधी हितसंबंधांचा मेळ घालणे आवश्यक आहे;***

***त्याअर्थी, आता, माहिती मिळविण्याची इच्छा असणाऱ्या नागरिकांना विवक्षित माहिती पुरविण्याकरिता तरतूद करणे इष्ट आहे;***

***भारतीय गणराज्याच्या छप्पन्नाव्या वर्षी, संसदेद्वारे तो पुढीलप्रमाणे अधिनियमीत होवो. ”***

म्हणजेच सार्वजनिक प्राधिकरणाच्या कामकाजामध्ये पारदर्शकता आणि उत्तरदायित्व निर्माण करणे व्यापक दृष्टीकोन आहे.

दुसरे म्हणजे, माहितीचा अधिकार हा नागरिकांना दिलेला आहे, जरी माहिती प्रकट करण्याबाबत अपवाद माहिती अधिकाराच्या कलम ८ मध्ये दिलेले असले तरी, ते माहिती अधिकाराच्या प्रस्तावनेसह/भूमिकेसह अमलात आणणे गरजेचे आहे.

जनमाहिती अधिकारी यांनी त्यांचे आदेशात जरी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ८(१)(त्र) नमूद करून, अपिलकर्ते यांनी मागितलेली माहिती उपलब्ध करून देता येत नाही म्हटले आहे, त्या नमूद ८(१)(त्र)

कलमाचा अर्थ समजून घेणे आवश्यक आहे, त्याची योग्य प्रमाणे खात्री करून घेणे आवश्यक आहे, ती खरच खाजगी बाबीत हस्तक्षेप करणारी आहे का? याविषयी माहिती अधिकारी यांनी त्यांच्या आदेशात कुठेही कारणमिमांसा केलेली नाही, फक्त कलम ८(१)(त्र) अन्वये माहिती नाकारली आहे.

**कलम ८(१)(त्र) च्या परतूंकाचे अवलोकन केले असता, जी माहिती संसेदेला किंवा राज्य विधान मंडळाला देण्यास नकार देता येणार नाही, ती माहिती कोणत्याही व्यक्तीला देण्यास नकार देता येणार नाही.**

माहिती नाकारताना केवळ कलम ८ (१) उदधृत न करता, माहिती नाकारण्याची संपूर्ण कारणे देणे माहिती अधिकाऱ्यास गरजेचे आहे. या प्रकरणी मा. अधिकारी यांनी तसे कुठलेही कारणे दिलेली नाही. या प्रकरणी केंद्रिय माहिती आयोगाने अपील क्र. CIC/OK/A/२००६/००१३६ दिनांक ७/९/२००६, मुकुल मित्तल वि. इरकॉन इंटरनेशनल लि. या अपिलात असा निर्देश दिला आहे की, कलम ८ (१) अंतर्गत माहिती नाकारतांना माहिती नाकारण्याची संपूर्ण कारणे देखील दिली पाहिजेत.

राकेशकुमार सिंह व इतर विरुद्ध लोकसभा सचिवालय व इतर या केस मध्ये केंद्रिय माहिती आयोगाच्या पूर्ण पिठाने असा निर्णय दिला आहे की, विभागीय पदोन्नती समितीची कार्यवाही किंवा तिचे इतिवृत, कलम ८ (१) खाली तरतूद केलेल्या कोणत्याही सुचित मोडत नाही आणि म्हणून अशी कार्यवाही व इतिवृत उघड केली पाहिजे. विभागीय पदोन्नती समितीच्या (DPC) व निवड समितीच्या बैठकाची कार्यवाही देखील उघड केली पाहिजे असा निर्णय शारदा पी. मेश्राम विरुद्ध कर्मिक प्रशिक्षण विभाग, ज्योती लेघा विरुद्ध युपीएससी व एन. एम. चावडा विरुद्ध UPSC या प्रकरणामध्ये देखील आयोगाने दिला आहे. त्याचे अपिल क्रमांक अनुक्रमे CIC/OK/ए/२००६/००२६६/०००५८/०००५६/००३१५ दिनांक २३/०४/२००६.

मा. केंद्रिय माहिती आयोगाने के. एस. सी. बाबू विरुद्ध NTPC या प्रकरणी पदोन्नतीसाठी विचारात घेतलेल्या प्रत्येक व्यक्तीस मिळालेल्या गुणांसंबंधी माहिती मागितली हि माहिती कलम ८ (१) (त्र) खाली नाकारली.

आयोगाने असा निर्णय घेतला की, निवडीच्या / पदोन्नतीच्या इ. बाबतीत निवडीच्या / पदोन्नतीच्या प्रकियेच्या गोपनीयतेशी तडजोड न करता, पारदर्शकता ठेवली पाहिजे. निवडीची / पदोन्नतीची प्रक्रिया पूर्ण होऊन निवड यादी जाहिर होईपर्यंत कलम ८(१)(त्र) लागू केले जाऊ शकते. तथापी, निवडीची / पदोन्नतीची प्रक्रिया पुर्ण होऊन निवडयादी जाहिर झाल्यावर कलम ८(१)(त्र) लागू होऊ शकत नाही. (अपिल क्रमांक ६६/आयसीपीबी/२००६/दिनांक ८ ऑगस्ट, २००६)

माहिती अधिकार कायदयाच्या कलम २(आय) च्या खंड (i) मध्ये 'फाईल' या शब्दातील 'फाईल नोटींग' उघड करता येईल किंवा कसे याबाबत खुलासा करून केंद्रिय माहिती आयोगाने दिनांक २३ जून २००९ रोजी अंतिम असा निर्णय दिला कि, माहिती अधिकार कायदयाच्या कलम ८ खालील माहिती उघड करण्यातील उपवाद नसतील तर फाईल नोटींग देखील उघड करता येईल व फाईल नोटींगची माहिती देता येईल.

मा. केंद्रिय माहिती आयोगाने अनुक्रमे माहिती अधिकार, अधिनियम २००५ कलम २ (फ) व (आय) खालील 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येकडे लक्ष वेधले असता आणि असे नमुद केले की, 'माहिती व अभिलेख' या दोन्ही शब्दांची व्याख्या सारखीच आहे दोन्ही शब्दांचा अर्थ व्यापक आहे. त्यामुळे 'फाईल' या शब्दातून 'फाईल नोटींग' वगळलेली नाही. 'फाईल' शब्दामध्ये दोन भागांचा समावेश होतो. पत्रव्यव्हाराचा अंतर्भाव असणारा भाग व मत्ते व सल्ले यांचा अंर्तभाव असणारा भाग यांस सामान्यपणे नोटींग म्हणून ओळखले जाते.

आयोगाने आणखी असा प्रकाश टाकला की, संपूर्ण पारदर्शकता घडवून आणणे हा माहितीच्या अधिकार अधिनियमाचा मुख्य उद्देश आहे. शासकिय गुपित अधिनियम व पुरावा कायदा यासारख्या वसाहतवादी कायदयाद्वारे निर्माण केलेली गुप्ततेची मानसिकता, संपूर्णपणे बदलणे हा या कायद्याचा उद्देश प्रस्तावनेत नमुद केला आहे. म्हणून माहिती उघड करण्यास परवानगी न देणे म्हणजे जनहिताशी द्रोह आहे.

संसदेस 'फाईल' हा शब्द माहितीच्या व्याख्येत समाविष्ट करताना फाईल नोंटीगचा देखील समावेश करण्ययाचा उद्देश होता. आयोगाने कर्मिक व प्रशिक्षक विभागाच्या कार्यलयीन कार्यपध्दतीच्या नियम पुस्तकेमध्ये अंतभूत असलेल्या 'फाईल' या शब्दाच्या व्याख्येकडे लक्ष वेधले आहे. प्रकरण दोनच्या कलम २७ च्या व्याख्येमध्ये असे स्पष्ट केले आहे की, 'फाईल' याचा अर्थ फाईल क्रमांक नेमून दिलेल्या आणि पुढीलपैकी एक किंवा अधिक भागाचा अंतर्भाव असणाऱ्या विशिष्ट विषयांवरील कागदपत्राचा समुच्चय असा आहे :-

१) पत्रव्यवहार
२) टिपणी (नोट)
३) पत्रव्यवहारची जोडपत्रे
४) टिप्पण्यांची जोडपत्रे

यातून असे अभिप्रेत आहे की, नोटींग हा कलम २(फ) खालील अभिलेखाचा अविभाज्य भाग आहे.
त्यामुळे फाईल मधील नोटींग वगळून कार्मिक व प्रशिक्षण विभाग खुद्द त्यांच्या नियमपुस्तकेच्या विरोधात जात आहे. शेवटी मा. केंद्रिय माहिती आयोगाने असा निर्णय दिला की, संवेदनक्षम माहितीची गोपनियता जतन करण्यासह फाईल नोटींग जनहिताच्या विरोध नसल्यास 'फाईल नोंटीग' वगळता येऊ शकणार नाही.

माहितीच्या व्याख्येने फाईल नोंटीगचा समावेश नसल्याबाबतची व्याख्या वगळण्यासाठी मा. आयोगाने कायद्याच्या कलम १९ (८) (अ) अन्वये आयोगाने ११/१२/२००८ रोजी कार्मिक व प्रशिक्षण विभागाला आदेश दिला; परंतू त्या विभागाच्या अधिकाऱ्यांनी आदेशाचे उल्लंघन केल्यामुळे त्यांनी भा.द.वि.संहितेच्या कलम १६६,१८७ व १८८ खालील शिक्षापात्रास अपराध केला आहे. आयोगाने दिनांक १७/०६/२००९ रोजी या अधिकाऱ्यांना व्यक्तिश: हजर राहण्यासाठी व वरील अपराधासाठी शिक्षा का करु नये याची कारणे दाखवा असा आदेश दिला.

शेवटी माहिती अधिकार कायद्याच्या कलम ८ खालील माहिती उघड करण्यातून सूट नसेल तर फाईल नोटींग देखील उघड करता येईल असे आदेश दिनांक २३/०६/२००९ रोजी भारत सरकार कडून काढण्यात आले (कर्मिक व प्रशिक्षण, भारत सरकार, ज्ञापन क्र. १/२०/२००९-आय,आर. दिनांक २३ जून २००९.

The Hon'ble High Court of Kerla in Case of John George Nechupadom V/s. Kerala State Information Commission & Anr. held that the Respondents have been seeking information of the minutes of the Board meeting. The minutes of the Board meeting, after its approval are sent to the Registrar of Company. It is therefore, a public document and thus cannot be said to be personal information as exempted U/s. 8(l)(j) of the RTI Act. The Order of the State information Commission in batch of petitions assailed by the Petitioners is perfectly justified and legal, upheld. Writ Petitions are dismissed.

Accordingly, to the above Judgment vis-a-vis the Commission is public Accordingly, any documents filed in its proceeding as well as on the official record of the Commission, it becomes a public document, since, the document available in the office of the Commission are public documents. Thus, documents available in the office of the public authority can not be denied to the Appellant herein the Appeal.

वरील कारण मिमासेवरून, अपिलार्थी यांचे अपील मान्य करण्यात येत आहे. माहिती अधिकार अर्जातील मुद्दा क्र. २ च्या संबंधाने आयोगातील कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती उपलब्ध करून देण्यात यावी. सदरहू माहिती, ही या निर्णयाच्या ७ दिवसांच्या आत उपलब्ध करून देण्यात यावी.

**जर प्रथम अपीलीय अधिका-यांच्या उत्तराने आपले समाधान झाले नाही तर आपण राज्य माहिती आयुक्त, १३वा मजला, नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर, मुंबई- ४०० ०३२ येथे अपील दाखल करू शकता.**

निर्णय

**अपील मंजूर करून निकाली काढण्यात येत आहे.**
**अपिलार्थी यांना सदर माहिती या निर्णयाच्या ७ (सात) दिवसांच्या आत उपलब्ध करून देण्यात यावी.**

(अनिलकुमार उके)
संचालक विधी (प्रभारी) तथा प्रथम अपिलीय अधिकारी

प्रति,
श्री. बाळू लहू उगले,
८०५, ओशिनिया 'ब' कासा रिओ,
लोढा पलावा, कल्याण शील रोड,
डोंबिवली (पूर्व), ता. कल्याण,
जि.ठाणे- ४२१२०४.
मो.नं. ९८२००४३४१७

(अनिलकुमार उके)
संचालक विधी (प्रभारी) तथा प्रथम अपिलीय अधिकारी